सुविचार
स्वत:ला कधीही कमी लेखू नका; तुमच्या आत्मविश्वासाने अशक्य गोष्टी सुद्धा शक्य होऊ शकतात.

# शिव वाणी

SHIV VANI
सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी

RNI : MAHMAR2003/14666 | L/130/RNP/Renewal/2025-2026

बीड (महाराष्ट्र) | साप्ताहिक | मराठी | वर्ष २२ वे | अंक ३७ वा | सोमवार दि.१५ डिसेंबर २०२५ | मो.९४२२७४८७९२/९८२२६२८५२१ | पान ४ | किंमत ३ रु.

Beed (Maharashtra) | Weekly | Marathi | Year 22 | Issu 37 | Monday. 15 Dec 2025 | Mo.9422748792/9822628521 | Page 4 | Prize Rs.3



शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड ☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड ☎: 0220377, मो. 9405072777


# कर्जमाफीचा फायदा **शेतकऱ्यांना** झाला पाहिजे, बँकांना नाही : **मुख्यमंत्री**

## चंद्र-सूर्य असेपर्यंत मुंबई महाराष्ट्रातच राहील ; पुढील दोन वर्षांत १ लाख २० हजार सरकारी नोकऱ्या देण्याचा निर्णय

**नागपूर (प्रतिनिधी) नागपुरात सुरू असलेल्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचा आज रविवारी शेवटचा दिवस आहे. अधिवेशनाच्या समारोपाच्या दिवशी अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा होणार असून, यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विरोधकांनी केलेल्या आरोपांना आणि उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तरे देणार आहेत. त्यामुळे आज सभागृहात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार शाब्दिक चकमक उडण्याची शक्यता आहे.**

आज अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीत प्रलंबित असलेल्या लक्षवेधी सूचनांवर संबंधित खात्याचे मंत्री उत्तरे देतील. 'या' ज्वलंत मुद्द्यांवरून सरकारची कोंडी होणार आजच्या कामकाजात विरोधकांनी सरकारला घेरण्यासाठी विविध मुद्दे तयार ठेवले आहेत. कर्जमाफीच्या मुद्द्यावर बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्य सरकारने कमिटमेंट केली आहे. आपल्यावर सध्या अतिवृष्टीचा ताण आलेला आहे. त्यामुळे आपलं बजेट अडचणीत आहे. या सगळ्या गोष्टी असल्या तरी शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याबाबत निर्णय आपण घोषित केलेला आहे. कुठल्याही परिस्थितीत कर्जमाफीचा फायदा शेतकऱ्यांना झाला पाहिजे, बँकांना नाही. 2017 ला आपण कर्जमाफी केली. 2020 केली. आपण कर्जमाफी केली तरीदेखील आपला शेतकरी हा आज कर्जमाफी मागत आहे. याचा अर्थ कुठेतरी आपल्या नियोजनात अडचण आहे. आपल्या कर्जमाफीतही आहे आणि शेतकऱ्यांच्या परिस्थितीत देखील आहे. त्यामुळे यावर एकदम उपाययोजना होणार नाहीत. पण हळूहळू टप्प्याटप्प्याने काय उपाययोजना करता येतील आणि त्या उपाययोजनेतला एक भाग म्हणून कर्जमाफी अशा पद्धतीने समिती काम करत आहे. एक जुलैपर्यंत कर्जमाफीची योजना काय असेल? याबाबत आम्ही घोषणा करू, असे त्यांनी म्हटले. एकनाथ शिंदेंच्या नेतृत्त्वातमहाराष्ट्रात महायुतीचे सरकार आल्यानंतर आम्ही महाभरती उपक्रम सुरू केला होता. या तीन वर्षांत महाराष्ट्रात १ लाख २० हजार सरकारी नोकऱ्या दिलेल्या आहेत. पुढील दोन वर्षांत तेवढ्याच नोकऱ्या देण्याचा निर्णय केलेला आहे असे मुख्यमंत्री म्हणाले.



# माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर अनंतात विलिन

## शासकीय इतमामात अंत्यसंस्कार; पोलिस दलाकडून मानवंदना

**लातूर (प्रतिनिधी)जवळपास सहा दशके आपल्या सुसंकृत राजकारणाने जनसेवा करणारे लातूर जिल्ह्याचे सुपुत्र शिवराज पाटील चाकूरकर यांच्या पार्थिवावर आज वरवंटी (ता. जि. लातूर) येथे शासकीय इतमामात, मंत्रोच्चारात अंत्यसंस्कार करण्यात आले. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ, राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी यावेळी पुष्पचक्र अर्पण करून शिवराज पाटील चाकूरकर यांना श्रद्धांजली वाहिली. तसेच पोलीस दलाच्या जवानांनी यावेळी बंदुकीच्या फैरींची सलामी देऊन मानवंदना दिली.**

(पान २ वर)





लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यासह मान्यवरांनी घेतले अंत्यदर्शन

राजकीय सुसंस्कृततेचा लौकिक जपणारे नेतृत्व गमावले - मुख्यमंत्री



# राष्ट्रीय लोकअदालतमध्ये बीड जिल्ह्यातील 1904 प्रकरणे निकाली

**वर्षानुवर्ष प्रलंबित असलेली 12 कोटी 53 लाख 01 हजार 982 एवढ्या रकमेची प्रकरणे एकाच दिवसात लागली मार्गी**

बीड (प्रतिनिधी) महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशावरून व आनंद एल. यावलकर प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्या मार्गदर्शनाखाली दि. 13 डिसेंबर 2025 रोजी पार पडलेल्या लोक न्यायालयात बीड जिल्हयातुन एकूण 1904 प्रकरणे तडजोडीने निकाली निघाली आहेत.

बीड मुख्यालयात राष्ट्रीय लोकन्यायालयाचे उद्घाटन आनंद एल.यावलकर, अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्या हस्ते 13 डिसेंबर रोजी संपन्न झाले. सदर उदघाटन कार्यक्रमास जिल्हा न्यायाधीश-1 व्ही.एच.पाटवदकर, तदर्थ जिल्हा न्यायाधीश एस.एस. घोरपडे व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव डब्ल्यू.ए.सय्यद, बीड मुख्यालयातील सर्व न्यायिक अधिकारी,

**(पान २ वर)**




**बीड : दैनिक समर्थ राजयोगच्या वार्षिक दिनदर्शिकेचे विमोचन करताना निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी साहेब. यावेळी संपादक वैभव स्वामी.**

# हिवाळी अधिवेशनाचे सूप वाजले

नागपूर (प्रतिनिधी) नागपुरात सुरू असलेल्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचा आज रविवारी शेवटचा दिवस होता. अधिवेशनाच्या समारोपाच्या दिवशी अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा पार पडली. अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विरोधकांनी केलेल्या आरोपांना आणि उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली. विधानसभेचे पुढील अधिवेशन २३ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबईत होणार आहे.

## झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासासंदर्भात केंद्र सरकारशी चर्चा करणार

नागपूर (प्रतिनिधी) कुर्ला विभागातील साबळे नगर, संतोषी माता नगर व क्रांती नगर येथील रेल्वेच्या जागेवर असलेल्या झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासासंदर्भात केंद्राकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही. दिल्लीमध्ये केंद्र सरकारशी संबंधित विषयांसाठी बैठकीत या प्रकल्पाचाही समावेश करून पाठपुरावा केला जाईल, अशी माहिती मंत्री शंभूराज देसाई यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली.

# नागपूरच्या मदर डेअरीला पंकजाताई मुंडे यांची भेट

नागपूर (प्रतिनिधी) नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डातंर्गत (NDDB) असलेल्या मदर डेअरी प्रकल्पास आज राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी भेट देऊन पाहणी केली. वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत विदर्भ-मराठवाडा दुग्धविकास प्रकल्पाचा आढावा यावेळी त्यांनी घेतला.

विधिमंडळातील कामकाज आटोपल्यानंतर ना. पंकजाताई मुंडे यांनी मदर डेअरी प्रकल्पास भेट दिली. दूध उत्पादकांकडून याठिकाणी मोठया प्रमाणात दूध संकलन करून ते इतर भागात पाठवले जाते तसेच दुधावर प्रक्रिया करून अनेक उत्पादने याठिकाणी तयार केले जातात. ना. पंकजाताई मुंडे यांनी संपूर्ण प्रकल्पाची पाहणी केली. विदर्भ आणि मराठवाड्यात नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डद्वारा (NDDB) मदर डेअरीच्या सहकार्याने बुटीबोरी नागपूर व इतर ठिकाणी राबविण्यात येणाऱ्या दुग्धविकास प्रकल्पाच्या अनुषंगाने ना. पंकजाताईनी यावेळी आढावा घेतला. राज्याचे पशुसंवर्धन सचिव एम रामास्वामी, आयुक्त प्रवीणकुमार देवरे, अतिरिक्त आयुक्त डॉ मुकणे, विदर्भ-मराठवाडा दुग्ध प्रकल्पाचे संचालक डॉ बोरानी आदी यावेळी उपस्थित होते. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी यावेळी प्रकल्पाची माहिती दिली. दूध उत्पादकांना प्रोत्साहन देऊन व्यवसायाला चालना मिळावी यासाठी जनजागृती करण्यासह विविध उपाय तसेच सूचना याप्रसंगी ना. पंकजाताई मुंडे यांनी दिल्या.



**विदर्भ-मराठवाडा दुग्धविकास प्रकल्पाचा घेतला आढावा**


शिव वाणी

**वीरशैव लिंगायत समाजातील बांधव / भगिनींनो...**
**पत्रकार व्हायचे आहे तर तात्काळ संपर्क साधा...**

महाराष्ट्र शासनाच्या शासनमान्य जाहिरात यादीवर मागील 22 वर्षापासून नियमित असलेले
**साप्ताहिक शिववाणी हे वृत्तपत्र जानेवारी 2026 पासून वीरशैव लिंगायत समाजाचे मुखपत्र म्हणून समाजासाठी समर्पित करत आहोत...**

या साप्ताहिकांमध्ये यापुढे वीरशैव लिंगायत समाजातील घडामोडींना प्राधान्य दिले जाईल. यासाठी तमाम महाराष्ट्रातील वीरशैव बांधव भगिनी यांना विनंती आहे की, जर आपल्याला पत्रकार व्हायचे असेल तरी सुवर्णसंधी साध्य करा.. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात, तालुक्यात, गाव पातळीवर तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहेत. या प्रतिनिधींनी आपल्या परिसरातील विविध मठ, त्या अंतर्गत असलेले कार्यक्रम, वीरशैव लिंगायत समाजाच्या विविध संघटना त्यांचे विविध कार्य, यासह वीरशैव लिंगायत समाजातील सामूहिक विवाह सोहळे, निधन वार्ता फोटोसहीत खालील व्हाट्सअप नंबर वर पाठवायच्या आहेत.

तत्पूर्वी आपली नियुक्ती निश्चित करण्यासाठी कृपया आपण आपले संपूर्ण नाव, रक्तगट, संपूर्ण पत्ता पिन कोड नंबर सहित मोबाईल नंबर,पासपोर्ट फोटो, तात्काळ खालील वॉट्स अप नंबर वर पाठवायचा आहे. ज्यांचे प्रथम अर्ज येतील त्यांना त्या जिल्ह्यातील प्रतिनिधी म्हणून नियुक्ती देण्यात येईल. कृपया फक्त वीरशैव लिंगायत समाजातील वृत्तपत्रात काम करणाऱ्या इच्छुकांनी तात्काळ वरील माहितीसह संपर्क साधावा ही विनंती..

**श्री. वैभव जगदेवी विवेक स्वामी,**
मुख्य संपादक
98 22 62 85 21

**श्री. आनंद डोंगरे**
कार्यकारी संपादक
98 81 2 5 72 47

## संपादकीय

# प्रवासी ठकले!

दहा दिवस झाले, तरी देशात हवाई प्रवास क्षेत्रात झालेला घोळ संपायची चिन्हं दिसत नाहीत. 'आता निदान पंधरा दिवसांत तरी हा घोळ निस्तरा' असं काकुळतीने सांगण्याची वेळ केंद्र सरकारवरच आली आहे! 'इंडिगो' ही आज देशातील अग्रगण्य विमान कंपनी आहे. देशाच्या विमान वाहतूक क्षेत्राचा ६५ टक्के वाटा या कंपनीकडे आहे. टाटांकडे २७ टक्के वाटा आहे. उरलेल्या टक्क्यात अन्य तीन-चार कंपन्या आहेत. 'इंडिगो'ने आपल्या व्यवहार कुशलतेने हवाई वाहतूक क्षेत्रावर मक्तेदारी मिळवली हे ठीक; पण एवढं महत्त्वाचं स्थान मिळाल्यावर त्याबरोबर काही कर्तव्य आणि जबाबदाऱ्याही येतात याची जाणीव त्या कंपनीला नाही. जेव्हा देशाच्या एखाद्या क्षेत्राच्या ६५ टक्के वाट्यावर आपण अधिराज्य गाजवतो, तेव्हा एका अर्थाने देशातल्या त्या क्षेत्राची सर्वाधिक जबाबदारी आपल्या खांद्यावर आलेली असते; कर्तव्यात चुकलो, तर त्या देशाची प्रतिमा खराब होतेच. पण, ज्यांनी आपल्याला मुक्त संधी आणि प्रोत्साहन दिलं, त्यांनाही आपण जनतेसमोर उघडं पाडतो याचा विसर 'इंडिगो'च्या व्यवस्थापनाला पडलेला दिसतो. अनेक क्षेत्र सरकारने खासगी उद्योगांना मुक्त करून दिली असून त्यांचे व्यवहार हे आता पूर्णपणे 'बाजारा'वर; म्हणजेच स्पर्धेवर सोडून दिले आहेत. खासगी उद्योगांचं सेवा व्यवस्थापन, वित्त व्यवस्थापन, कर्मचाऱ्यांबाबतचं धोरण यात सरकार फार हस्तक्षेप करू शकत नाही. त्यामुळेच 'इंडिगो'ने लाखो प्रवाशांचं जगणं वेठीला धरूनही सरकार त्यांच्यावर अद्याप काही कारवाई करू शकलेलं नाही. वाहतूक क्षेत्राची नियामक संस्था म्हणून देशात 'नागरी विमान वाहतूक महासंचालनालय' आहे. पण, हे महासंचालनालयच बेसावध राहिल्याने हा अभूतपूर्व गोंधळ निर्माण झाला असून आता कारवाई करायची तर आधी कोणावर करावी, असा प्रश्न सरकारला पडला आहे. 'इंडिगो'ने बेजबाबदारपणा केला आहेच. पण, विमान वाहतूक क्षेत्रातल्या कंपन्या आपल्या जबाबदाऱ्या नीट पार पाडताहेत की नाही, याची खातरजमा करण्यासाठी जी नियामक यंत्रणा आहे, तिनेच डोळेझाक केली असल्याने सरकारची पंचाईत झाली आहे. झालेला घोळ लवकर निस्तरला नाही आणि त्यातून राष्ट्रीय संपत्तीचं नुकसान झालं, या आरोपाखाली पंधरा दिवसांनंतर सरकारला कदाचित कारवाई करता येईल! कोणतंही वाहन संकेत आणि नियम न पाळता चालवणं धोक्याचंच असतं. विमान विशेष धोक्याचं. कारण, ते अधांतरी तीस-पस्तीस हजार फुटांवरून उडत असतं. अगदी शे-दोनशे फुटांवर त्यात काही अडचण, संकट आलं तरी मदत करता येणं अशक्य असतं. त्यामुळे, विमानाची देखभाल नेहमीच खूप काटेकोरपणे केली जाते. वैमानिकाचं प्रशिक्षण खूप खडतर असतं. त्यांना नियमांचं, मार्गदर्शक सूचनांचं खूप काळजीपूर्वक पालन करावं लागतं. आपली बौद्धिक, मानसिक आणि शारीरिक तंदुरुस्ती सतत सिद्ध करावी लागते. विमान कंपनीसाठी, कंपनीच्या व्यवस्थापनासाठी, वाहतूक व्यवस्थापनासाठी- राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही पातळ्यांवर असंख्य तपशीलवार कडक नियम आहेत. त्यांची छाननी, फेरआखणी सातत्याने होत असते. विमान प्रवास करणाऱ्या प्रवाशांमध्ये आता मध्यमवर्गीयांची संख्या वाढली असली, तरी आजही विमान प्रवाशांची प्रतिष्ठा ही अन्य कोणत्याही साधनांनी प्रवास करणाऱ्या प्रवाशांपेक्षा उच्च श्रेणीतलीच मानली जाते. त्यामुळे, जगभर त्यांची विशेष काळजी घेतली जाते. वैमानिक, हवाई सेवक आणि सेविकांच्या प्रशिक्षणाकडे, त्यांच्या वर्तणुकीकडे, मिळकतीकडे विशेष लक्ष दिलं जातं. भारतात गेल्या पंधरा वर्षांत तीन मोठे विमान अपघात झाले. त्यात शेकडो बळी गेले. यातल्या एका अपघातात 'वैमानिकाचा थकवा' हे कारण पुढे आल्यानंतर दिल्ली उच्च न्यायालयात एक याचिका दाखल झाली. त्या याचिकेवर विचार करताना न्यायालयाने महासंचालनालयाला काही निर्देश दिले. त्यावरून वैमानिकांच्या विश्रांतीचे तास आठवड्याला ३६ वरून सलग ४८ केले गेले. रात्रपाळीच्या, दिवसाच्या कामाच्या तासांतही बदल झाले. या सगळ्या गोष्टींची अंमलबजावणी अनिवार्य होती. सरकारचे नवे नियम अमलात आणायचे, तर वैमानिकांची संख्या वाढवावी लागणार, हे उघड होतं. १८ महिन्यांपूर्वीच याबाबतची स्पष्टता येऊनही 'इंडिगो' गेलं दीड वर्ष काहीही न करता तशीच बसून राहिली. सरकारची कुठलीच गोष्ट गंभीरपणे घ्यायची नसते, या गैरसमजाचे ती शिकार झाली. 'सब चल जाता है' या राष्ट्रीय रोगाने तिचा घात केला. त्याची शिक्षा लाखो प्रवाशांना भोगावी लागली. सरकारला आरोपीच्या पिंजऱ्यात उभं राहावं लागलं. 'इंडिगो' पाठोपाठ देशात या क्षेत्रात दुसऱ्या क्रमांकावर 'टाटां'ची 'एअर इंडिया' आहे. त्यांच्याकडे बरीच जुनी विमान असल्याने अनेक जायबंदी आहेत.

पान १ वरुन

## बीड जिल्ह्यातील 1904 प्रकरणे निकाली

बीड जिल्हा वकील संघाचे प्रभारी अध्यक्ष श्री.आर.व्ही.देशमुख तसेच त्यांचे सर्व पदाधिकारी, विधिज्ञ उपस्थित होते. बीड जिल्हयातून न्यायालयातील प्रलंबीत प्रकरणांपैकी एकूण 8265. प्रकरणे ठेवण्यात आली होती. यामध्ये दिवाणी, फौजदारी, मोटार अपघात, भुसंपादनाची प्रकरणे, 138 एन.आय.ॲक्टच्या प्रकरणांचा समावेश होता. त्यापैकी 543 प्रकरणे निकाली निघाली आहेत. दाखलपुर्व प्रकरणामध्ये एकूण 33221. प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी 1361 प्रकरणे निकाली निघाली आहेत. असे एकूण 1904. प्रकरणे निकाली निघाली आहेत व यामध्ये 12 कोटी 53 लाख 01 हजार 982 एवढ्या रकमेची प्रकरणे निकाली निघाली आहेत. सदरील लोक न्यायालयाच्या यशस्वीतेसाठी डब्ल्यू.ए.सय्यद, सदस्य सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्यासह बीड मुख्यालयातील सर्व न्यायिक अधिकारी, बीड जिल्हा वकील संघाचे प्रभारी अध्यक्ष आर.व्ही.देशमुख व त्यांचे सर्व सहकारी पदाधिकारी तसेच वकील संघाचे सर्व सदस्य, जिल्हा सरकारी वकील व सर्व सरकारी अभियोक्ता यांची लोकन्यायालयात प्रमुख उपस्थिती होती.न्यायालयीन कर्मचारी, बँक कर्मचारी, पोलीस कर्मचारी व इतर कार्यालयीन कर्मचारी यांनी लोकअदालत यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. या लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे मार्गी लागावीत यासाठी पत्रकार वैभव स्वामी यांनी विशेष परिश्रम घेतले, यामुळे अनेक पिडीतांना न्याय मिळाला.

# शिवराज पाटील चाकूरकर राजकारणातील निष्कलंक पर्व

**चाकुरकर यांच्या जाण्याने देशाने एक मार्गदर्शक नेता गमावला आहे. त्यांचे विचार, मूल्ये, उदाहरण आणि शिस्तप्रियता हीच त्यांची खरी वारसा-ठेव आहे. आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर साहेबांना विनम्र...**

**भारतीय राजकारणातील एक निष्कलंक, अभ्यासू आणि संयमी नेतृत्वाचे प्रतीक असलेले माजी केंद्रीय गृहमंत्री, लोकसभेचे माजी सभापती आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मा. शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाने (जन्म: १२ ऑक्टोबर १९३५ – मृत्यू: १२ डिसेंबर २०२५) देशाच्या राजकीय क्षितिजावर एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. आपल्या 'सुसंस्कृत, मूल्यनिष्ठ आणि निष्कलंक' राजकीय प्रवासाने त्यांनी एक असा आदर्श निर्माण केला, जो येणाऱ्या प्रत्येक राजकीय पिढीसाठी मार्गदर्शक ठरेल.**



### आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर यांच्या नेतृत्वाचा प्रवास...

नगराध्यक्षपदापासून पंजाबचे राज्यपाल या सर्वोच्च पदांपर्यंतचा त्यांचा प्रवास हा चारित्र्यनिष्ठ नेतृत्वाचा एक वस्तुनिष्ठ, पण हृदयस्पर्शी अध्याय आहे. प्रमुख राजकीय टप्पे म्हणून लातूरचे नगराध्यक्ष म्हणून १९६६ मध्ये सुरू झालेली त्यांची सार्वजनिक कारकीर्द देशाच्या सर्वोच्च पदांपर्यंत पोहोचली. नगराध्यक्ष, लातूर १९६६ ते १९७०, आमदार, लातूर १९७२ ते १९८०, विधानसभा अध्यक्ष, महाराष्ट्र १९७८ ते १९७९, लोकसभा सदस्य, लातूर, १९८० ते २००४ (सात वेळा), लोकसभा सभापती (स्पीकर),१९९१ ते १९९६, केंद्रीय गृहमंत्री २००४ ते २००८, राज्यपाल, पंजाब २०१० ते २०१५ असा राहीला आहे.

### मूल्याधिष्ठित राजकारणाचे प्रतीक....

आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या ६० वर्षांच्या प्रदीर्घ राजकीय आयुष्यात त्यांच्यावर एकही आरोप, राजकीय डाग किंवा भ्रष्टाचाराचे शिंतोडे लागू दिले गेले नाहीत. त्यांनी कायम मूल्याधिष्ठित राजकारणाचे प्रतीक म्हणून स्वतःला सिद्ध केले. गांधी परिवाराचे निकटवर्तीय असूनही, त्यांनी कधीही आपल्या पदाचा वा अधिकाराचा गैरवापर केला नाही. २००४ मध्ये पराभूत झाल्यानंतरही त्यांचा राजकीय प्रभाव कायम राहिला, जो त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खोली दर्शवतो.

**संसदीय परंपरांचे जनक...**

आदरणीय शिवराज पाटील साहेब यांनी संसदेत आणि विधिमंडळात एक आदर्श राजकीय संस्कृती रुजवली. लोकसभा सभापती म्हणून (१९९१-१९९६) त्यांनी निर्माण केलेल्या नवनवीन संसदीय परंपरा, नियमांचे काटेकोर पालन आणि सभागृहातील शिस्तयाकडे आजही आदराने पाहिली जाते. मराठी, इंग्रजी आणि हिंदी भाषेवरील त्यांचे प्रभुत्व मोठे होते. त्यांच्या विचारमंथनातून आणि मांडणीतून विषयाची सखोलता, संतुलन आणि विवेक दिसून येई. राजकारणात कुरघोडी करणे किंवा विरोधकांवर टीका करणे त्यांनी कटाक्षाने टाळले. त्यांनी विरोधकांसाठीही कधीही अपशब्द वापरले नाहीत, ज्यामुळे त्यांचा संवाद कायम सभ्य आणि शिस्तबद्ध राहिला. विरोधकांसोबतही राखलेला शिस्तबद्ध आणि सभ्य संवाद हा त्यांच्या नेतृत्वाचा दुर्मिळ गुण होता. त्यांच्या या गुणांमुळेच भारतीय लोकशाही व्यवस्थेला शांत, संयमी आणि कणखर नेतृत्व प्राप्त झाले.

### लातूरच्या विकासाचे प्रणेते

आदरणीय शिवराज पाटील साहेब यांचे कार्य केवळ दिल्लीपुरते मर्यादित नव्हते, तर त्यांनी लातूर आणि मराठवाड्याच्या राजकीय घडामोडींना नवी दिशा दिली. लातूरचे नगराध्यक्ष असताना त्यांनी शिवछत्रपती वाचनालयासारख्या ज्ञान-उपक्रमांची पायाभरणी केली. तसेच, शहर विकासाचे अनेक दूरदृष्टीचे प्रकल्प राबवले, ज्यामुळे लातूरच्या विकासाचा प्रारंभ झाला. ते लिंगायत समाजातून आले असले तरी, त्यांनी स्वतःला कधीही एका जातीपुरते मर्यादित ठेवले नाही. सर्वधर्म समभावाचे पालन करतानाच, लातूरमधील सर्व समाज घटकांत त्यांचे मोठे आदराचे स्थान होते. लातूरच्या राजकारणात आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर, डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर, आदरणीय विलासराव देशमुख आणि सहकार महर्षी दिलीपराव देशमुख या नेत्यांमुळे उच्च मूल्यांची परंपरा निर्माण झाली. आज या माध्यमातूनच जिल्ह्यात सहकार, शिक्षण, सिंचन, उदयोग, रेल्वेसह पायाभुतसुवींधांच्या विकासाला मोठी चालना मिळाली.

### लोकशाहीतील अमूल्य योगदान

आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर यांनी ११ व्या लोकसभेचे सभापती (स्पीकर) म्हणून कार्य केले. त्यांची भूमिका केवळ सभागृहाचे कामकाज चालवण्यापुरती मर्यादित नव्हती, तर त्यांनी भारतीय संसदीय लोकशाहीत शिस्त, संयम आणि नवीन परंपरा रुजवली. उत्कृष्ट संसदपटू पुरस्कारः देशाच्या लोकशाहीला अधिक बळकटी देण्यासाठी आणि सदस्यांना त्यांच्या संसदीय कार्यात उत्कृष्ट कामगिरीसाठी प्रेरणा मिळावी म्हणून, १९९२ मध्ये त्यांनी 'उत्कृष्ट संसदपटू पुरस्काराची' सुरुवात केली. नवीन संसद भवनाची कल्पनाः सध्याच्या संसद भवनाची व्याप्ती आणि भविष्यातील गरजा लक्षात घेऊन, मा. चाकूरकर यांनी लोकसभेचे सभापती असताना नवीन संसद भवनाच्या निर्मितीचा प्रस्ताव ठेवला होता. विधानसभा अध्यक्ष आणि लोकसभा सभापती या दोन्ही पदांवर असताना त्यांनी घेतलेले निर्णय आजही संसदीय कामकाजात उत्तम उदाहरण म्हणून पाहिले जातात.

### नैतिकतेचा सर्वोच्च मापदंड...

सन २००४ च्या लोकसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर, काँग्रेस पक्षाने त्यांचा अनुभव ओळखून त्यांना राज्यसभेवर घेतले आणि डॉ. मनमोहन सिंग यांच्या मंत्रीमंडळात केंद्रीय गृहमंत्री हे अत्यंत महत्त्वाचे पद दिले. या काळात त्यांनी अंतर्गत सुरक्षा आव्हानांना शांतपणे तोंड दिले. त्यांच्या संपूर्ण राजकीय कारकिर्दीत कोणताही भ्रष्टाचाराचा आरोप नसणे, हे त्यांच्या चारित्र्यसंपन्न नेतृत्वाचे प्रमाण आहे. आदरणीय शिवराज पाटील साहेब यांच्या कार्यकाळात, २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर भीषण दहशतवादी हल्ला झाला. या गंभीर राष्ट्रीय घटनेची नैतिक जबाबदारी स्वीकारत, त्यांनी हल्ल्यानंतर अवघ्या दोन दिवसांनी, ३० नोव्हेंबर २००८ रोजी, गृहमंत्रिपदाचा राजीनामा दिला. राजकारणात सर्वोच्च पदावर असताना नैतिकतेचे मूल्य जपत राजीनामा देण्याचा हा निर्णय त्यांच्या चारित्र्यनिष्ठ नेतृत्वाचा आणि उच्च राजकीय संस्कृतीचा एक महत्त्वाचा दाखला आहे. १२ डिसेंबर २०२५ रोजी, वयाच्या ९० व्या वर्षी, लातूरमधील देवघर निवासस्थानी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गृहमंत्री, लोकसभा सभापती आणि राज्यपाल म्हणून त्यांनी घेतलेले महत्त्वपूर्ण निर्णय देशासाठी नेहमीच मार्गदर्शक ठरले आहेत. आपल्याला सोडून गेले तरी भारतीय राजकारणातील एक 'निष्कलंक आणि ऋषितुल्य' पर्व आपल्या सोबत कायम राहील. या निधनाने देशाने एक मार्गदर्शक नेता गमावला आहे. त्यांचे विचार, मूल्ये, उदाहरण आणि शिस्तप्रियता— हीच त्यांची खरी वारसा-ठेव आहे. आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर साहेबांना विनम्र, भावपूर्ण श्रद्धांजली. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि चाकूरकर कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो.

# माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर अनंतात विलिन



तत्पूर्वी सकाळी देवघर निवासस्थानी शिवराज पाटील यांच्या पार्थिवाला पोलीस दलातर्फे मानवंदना दिल्यानंतर अंत्ययात्रेला सुरुवात झाली. फुलांनी सजविलेल्या रथातून त्यांचे पार्थिव औसा रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक, पीव्हीआर चौकमार्गे वरवंटी येथे पाटील चाकूरकर कुटुंबियांच्या शेतामध्ये आणण्यात आले. याठिकाणी शोकाकुल जनसमुदायाच्या उपस्थितीत शिवराज पाटील चाकूरकर यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी उपस्थित विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शिवराज पाटील चाकूरकर यांचे पुत्र शैलेश पाटील चाकूरकर, स्नुषा डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्यासह कुटुंबियांचे सांत्वन केले. कर्नाटक राज्याचे वनमंत्री ईश्वर खंड्रे, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, माजी मंत्री दिलीपराव देशमुख, खासदार डॉ. भागवत कराड, खासदार रजनीताई पाटील, खासदार डॉ. अजित गोपछडे, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार अमित विलासराव देशमुख, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार, माजी केंद्रीय मंत्री भगवंत खुबा, माजी खासदार चंद्रकांत खैरे, नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, पंजाब पोलीस दलाचे उपमहानिरीक्षक इंदरवर सिंग, लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, मुंबई उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश नरेश पाटील, अखिल भारतीय काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही यावेळी शिवराज पाटील चाकूरकर यांच्या पार्थिवाला पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

शिवराज पाटील चाकूरकर यांनी आपल्या ६ दशकांच्या राजकीय, सामाजिक जीवनात प्रामाणिकपणे देशाची सेवा केली. लोकसभेचे अध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी लोकशाहीचे मंदिर असलेल्या संसदेची प्रतिष्ठा कायम ठेवण्यासाठी भरीव योगदान दिले केला, संसदीय परंपरेला नवा आयाम दिला. संसदीय समित्यांसाठी त्यांनी पुढाकार घेतला. राजकारणातील त्यांचे योगदान नेहमीच स्मरणात राहील, अशा शब्दात लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले असल्याचे सांगून केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ म्हणाले की, राष्ट्रासाठी समर्पित भावनेने काम करणारा आणि लोकशाहीला मजबूत बनविण्यासाठी प्रयत्न करणारा एक विनम्र राजकारणी आपण गमावला आहे. त्यांच्या निधनाने मोठे नुकसान झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. शिवराज पाटील चाकूरकर यांच्यासोबत १९६७ पासून काम करण्याची संधी मिळाली. त्यांनी विविध पदांवर काम करताना समाजाची सेवा करत विकासासाठी भरीव योगदान दिले. त्यांची उणीव सदैव भासत राहील, असे राज्यसभा विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यावेळी म्हणाले. शिवराज पाटील चाकूरकर हे सुसंस्कृत राजकारणी म्हणून परिचित होते. लातूर जिल्ह्याच्या राजकारणाला सुसंस्कृत बनविण्यात त्यांचे योगदान मोठे आहे. त्यांच्या सुसंस्कृत नेतृत्वाचा वारसा पुढे घेऊन जाणे, हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे आमदार संभाजी पाटील निलंगेकर यावेळी म्हणाले. खासदार म्हणून काम करताना शिवराज पाटील चाकूरकर यांचे आपल्याला सदैव मार्गदर्शन लाभल्याचे माजी खासदार चंद्रकांत खैरे यावेळी म्हणाले. तसेच त्याबाबतच्या काही आठवणी त्यांनी सांगितल्या. सुसंस्कृत आणि चारित्र्यसंपन्न राजकारणी अशी ओळख असलेल्या शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाने सर्वत्र शोककळा पसरली आहे. असे माजी मंत्री बसवराज पाटील यावेळी म्हणाले. राज्य कृषि मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, कर्नाटकमधील आमदार बी. आर. पाटील, महाराष्ट्राचे माजी मंत्री बाळासाहेब जाधव, माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील, माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड, माजी खासदार सुधाकर श्रृंगारे, माजी आमदार शिवाजी पाटील कव्हेकर, माजी आमदार बब्रुवान खंदाडे, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष तथा माजी आमदार धीरज विलासराव देशमुख यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.ज्येष्ठ नेते देशाचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे अंतिम दर्शन घेण्यासाठी काशीचे जगद्गुरु तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्राच्या पर्यटन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्यासह राजकीय, सामाजिक क्षेत्रातील प्रतिष्ठित नागरिकांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून अखेरचा निरोप दिला.

### महाराष्ट्र राजकीय सुसंस्कृततेचा लौकिक जपणाऱ्या उत्तुंग नेतृत्वाला मुकला - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्राच्या शालीनता, सुसंस्कृततेचा लौकिक जपणारे आणि तो राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय पोहचविणारे नेतृत्व म्हणून ज्येष्ठ नेते शिवराज पाटील- चाकूरकर सदैव स्मरणात राहतील, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी लोकसभा अध्यक्ष, केंद्रीय मंत्री शिवराज पाटील - चाकूरकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. त्यांच्या निधनामुळे राजकारण- समाजकारणातील उत्तुंग अशा मार्गदर्शक नेतृत्वाला मुकलो आहोत, अशी शोकभावना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.

## सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार

# दीपावली युनेस्कोच्या अमूर्त सांस्कृतिक वारसा यादीत

नागपूर (प्रतिनिधी) युनेस्कोच्या अमूर्त सांस्कृतिक वारसा यादीत दीपावलीचा समावेश करण्यात आल्याने भारतीय संस्कृतीचा दरवळ आता जगभर प्रसरेल, असे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी विधानसभा आणि विधान परिषदेत निवेदनात सांगितले.

महाराष्ट्राची सांस्कृतिक क्षेत्रातील कामगिरी अधोरेखित करणारे मराठा लष्करी भूरचनेचे यूनेस्कोचे मानांकन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली यावर्षी मिळवले. हा वारसा tangible म्हणजेच मूर्त स्वरूपाचा असल्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.शेलार यांनी सांगितले.

आता युनेस्कोच्या अमूर्त सांस्कृतिक वारसा (Intangible Cultural Heritage) यादीत दीपावलीचा समावेश करण्यात आला आहे. ही आपल्या सर्वांसाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाने



वर्ष 2025-26 साठी दीपावलीचे नामांकन केले होते. अंधारातून प्रकाशाकडे, आशेकडे आणि संघर्षातून यशाकडे नेणारा हा सण सकारात्मकतेचे प्रतीक आहे.

दीपावली हा महाराष्ट्राच्या कृषी संस्कृतीशी आणि मराठी परंपरेशी अतूट नाते असलेला उत्सव आहे. या सणाचा इतिहास निश्चित प्राचीन आहे. निसर्गावर आधारित साजरे होणारे सण हे भारतीय संस्कृतीचे वेगळेपण त्याचे जागतिक अद्वितीय मूल्य अधोरेखित करतात. यामुळे भारतीय सण, परंपरा पर्यायाने भारतीय संस्कृतीचा जगात प्रसार होण्यास हातभार लागणार आहे.

आपल्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेला हा ऐतिहासिक गौरव मिळवून देण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय संस्कृती मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे हे शक्य झाले, असे नमूद करीत सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.शेलार यांनी सभागृहाच्या वतीने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व केंद्रीय संस्कृती मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांचे आभार मानले.

हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स ॲण्ड पब्लिशर्स, मोंढा रोड, बीड जि. बीड-४३११२२ येथे छापून
साप्ताहिक शिववाणी बीड कार्यालय : घर नं. १०२, छत्रपती कॉलनी, क्रांती नगर, तहसीलच्या मागे, बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिध्द केले. (सर्व वाद बीड न्यायकक्षेत).

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT INDRADHANUSHYA PRINTERS & PUBLISHERS, MONDHA ROAD, BEED, DIST.HEED-431122
AND PUBLISHED AT H.NO.102, CHATRAPATI COLONY, KRANTI NAGAR, TAHASIL BACKSIDE, BEED-431122 (MAHARASHTRA) (JURISDICTION AT BEED)


# कोणत्याही परिस्थितीत लाडकी बहिण योजना बंद होणार नाही : एकनाथ शिंदे



## अधिवेशनाच्या लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात शिंदे यांची ग्वाही

नागपूर (प्रतिनिधी) लाडकी बहीण योजना ही सरकारची लोकाभिमुख आणि जनकल्याणकारी योजना असून ती कोणत्याही परिस्थितीत बंद होणार नाही. योजना सुरू करताना आम्ही सकारात्मक भावनेने निर्णय घेतला, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली.

विधानसभा सदस्य सुनील प्रभू, जयंत पाटील, नानाभाऊ पटोले, हारून शेख यांनी लाडकी बहीण योजनेसंदर्भात एका लक्षवेधी सुचनेद्वारे विचारणा केली असता, उपमुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी उत्तर दिले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, आचारसंहितेच्या काळातही लाभार्थींना अडथळा येऊ नये म्हणून आगाऊ निधीही उपलब्ध करून देण्यात आले होते. लाभार्थी बहिणींनी सरकारच्या कामावर विश्वास ठेवून मोठ्या प्रमाणात जनादेश दिला आहे. त्यामुळे ही योजना कमी करणे किंवा बंद करणे तर दूरच, आम्ही ज्या-ज्या घोषणा केल्या आहेत त्या योग्य वेळी पूर्ण केल्या जातील. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले की, लाडकी बहीण योजना ही राज्यातील लाखो महिलांसाठी मोठा आधार असून तिचा विस्तार आणि लाभ सातत्याने सुरु राहील. शासन दिलेल्या सर्व वचनांची पूर्तता करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



## लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थींच्या अचूक प्रमाणीकरणासाठी ई-केवायसी प्रक्रियेत मोठी प्रगती : आदिती

लाडकी बहीण योजनेसाठी एकूण 2 कोटी 63 लाख 83 हजार 589 अर्ज प्राप्त झाले होते. यापैकी 2 कोटी 43 लाख 82 हजार 936 अर्ज विभागाने पात्रतेनुसार ग्राह्य धरले. उर्वरित फॉर्म हे प्राथमिक पडताळणीतच अपात्र ठरले होते. माहिती तंत्रज्ञान विभागाकडून प्राप्त झालेल्या 26 लाख अर्जांच्या डेटाचे क्रॉस-व्हेरिफिकेशन करताना केवळ 4 लाख अर्जांचे पुनर्पडताळणीची आवश्यकता आढळली. उर्वरित सर्व अर्ज पात्र लाभार्थी म्हणून निश्चित करण्यात आले. योजनेसाठी आवश्यक असलेली विभागनिहाय माहिती ही संबंधित विभागांकडून मागवण्यात आली होती. कृषी विभागाकडील नमो शेतकरी योजनेचे लाभार्थी, अन्न व नागरी पुरवठा विभाग, शालेय शिक्षण विभाग तसेच माहिती तंत्रज्ञान विभागाकडील डेटाचा वापर करून लाभार्थ्यांची सखोल पडताळणी करण्यात आली. लाभ घेण्यास अपात्र असलेले सुमारे 8 हजार शासकीय कर्मचारी (मुख्यतः आरोग्य व इतर सरकारी यंत्रणांमधील कर्मचारी) यांनी घेतलेले रकमेची रिकव्हरी प्रक्रिया मागील 5–6 महिन्यांपासून सुरू असून पुढील दोन महिन्यांत पूर्ण होणार आहे.

साधारणपणे 12 ते 14 हजार महिलांच्या नावावर पुरुषांची बँक खाती जोडलेली असल्याचे पडताळणीत दिसून आले. अनेक महिलांची वैयक्तिक खाती नसल्यामुळे त्यांनी घरातील वडील, भाऊ किंवा पती यांची खाती दिल्याचे स्पष्ट झाले. विभागाने अशा प्रकरणांचे सखोल परीक्षण करून कोणतीही पात्र महिला लाभापासून वंचित राहणार नाही, याची खात्री केली आहे. लाभार्थींचे अचूक प्रमाणीकरण करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या ई-केवायसी प्रक्रियेत मोठी प्रगती झाली असून, आत्तापर्यंत 1 कोटी 74 लाखांहून अधिक महिलांची ई-केवायसी पूर्ण झाली आहे. ई-केवायसीची अंतिम मुदत 31 डिसेंबर असून, उर्वरित लाभार्थ्यांनाही ही सुविधा उपलब्ध आहे.

**मंत्री शंभूराज देसाई**

## जुन्या इमारतींच्या 5 ते 10 वर्षे रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पाचा आढावा घेणार



नागपूर (प्रतिनिधी) मुंबईमधील जुन्या इमारतींच्या 5 ते 10 वर्षे रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पाचा आढावा घेण्यात येईल. या प्रकल्पांना गती देण्यासाठी आवश्यक वाटल्यास विकासकावर कारवाई केली जाईल, असे मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली. मुंबईतील जिजामाता नगर, काळाचौकी येथील त्यांच्या पुनर्विकास प्रकल्पासंदर्भात सदस्य अजय चौधरी यांनी लक्षवेधीद्वारे सूचना मांडली होती. त्याला उत्तर देताना श्री. देसाई बोलत होते.मंत्री श्री. देसाई म्हणाले की, जिजामाता नगर, काळाचौकी येथील झोपडपट्ट्याच्या पुनर्विकास संदर्भात तत्कालीन पालकमंत्र्यांनी बैठक घेऊन सूचना केल्या होत्या. त्या सूचनानुसार विकासकामे कामे केली नसल्यास त्याच्यावर कार्यवाही करण्यात येईल. या संदर्भात पुढील एक महिन्यात पुन्हा बैठक घेण्यात येईल. मुंबईतील अनेक वर्ष रखडलेल्या जुन्या इमारतींच्या पुनर्विकास प्रकल्पांचा आढावा घेऊन विकासकांना अखेरची संधी देण्यात येईल. असे मंत्री शंभूराज देसाई सांगितले.

**मंत्री डॉ. उदय सामंत**

## पुण्यातील भुयारी मार्ग तयार करण्यासंदर्भात मुख्यमंत्री बैठक घेणार



नागपूर (प्रतिनिधी) पुणे शहरातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी स्वारगेट, शनिवारवाडा येथे तीन मार्गिकेचे दोन भुयारी मार्ग तयार करण्याचे काम पुणे महानगरपालिका किंवा सार्वजनिक बांधकाम विभाग यापैकी कोणी करावे, यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लवकरच निर्णायक बैठक घेणार असल्याची माहिती मंत्री डॉ.उदय सामंत यांनी विधानसभेत दिली.

विधानसभा सदस्य हेमंत रासने यांनी यासंदर्भात एक लक्षवेधी सुचनेद्वारे विचारणा केली असता मंत्री डॉ.सामंत यांनी उत्तर दिले.मंत्री डॉ.सामंत यांनी सांगितले की, ८ ऑगस्ट २०२५ रोजी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली यशदा येथे झालेल्या बैठकीत पुणे महानगरपालिकेला डीपीआर आणि मास्टर प्लॅन तयार करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले होते. मात्र काही कालानंतर पुणे महानगरपालिकेने सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्र लिहून, आमच्याकडे आवश्यक यंत्रणा नसल्याने हे काम सार्वजनिक बांधकाम विभागाने करावे, अशी विनंती केली.

**मंत्री ॲड.आकाश फुंडकर**

## उद्योगांच्या विनापरवाना युनिट्ससाठी विशेष स्पेशल ड्राईव्ह



नागपूर (प्रतिनिधी) राज्यातील औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या संदर्भात सुरक्षा उपाययोजना न पाळणाऱ्या उद्योगांवर खटले दाखल केले जातील. कामगारांना आवश्यक सुरक्षा साधने न देणाऱ्या कंपन्यांवर कडक कारवाई केली जाईल तसेच विनापरवाना युनिट्सकरिता 'स्पेशल ड्राईव्ह' घेण्यात येईल, अशी माहिती कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर यांनी लक्षवेधी उत्तरात दिली.

विधानसभा सदस्य शंकर जगताप, अर्जुन खोतकर, बाबाजी काळे यांनी पुणे जिल्ह्यातील भोसरी येथे एका कंपनीमध्ये स्फोट होऊन झालेल्या दुर्घटनेसंदर्भात प्रश्न विचारला होता. कामगार मंत्री ॲड.फुंडकर म्हणाले की, एमआयडीसीतील सर्व कारखान्याचे सुरक्षा ऑडिट केले जाणार असून काही त्रुटी आढळल्यास त्यांना सूचना देण्यात येतील. सूचना देऊनही त्याचे पालन न झाल्यास त्यांच्यावर खटले दाखल केले जातील आणि दंडात्मक कारवाई केली जाईल. अशी माहिती कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर यांनी लक्षवेधी उत्तरात दिली.

**राज्यमंत्री माधुरी मिसाळ**

## वर्सोवा क्रिस्टल पॉईंट मॉलमधील अनधिकृत बांधकामावर कारवाई



नागपूर (प्रतिनिधी) वर्सोवा क्रिस्टल पॉईंट मॉल मधील अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधानसभेत दिली. सदस्य हारून खान यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना राज्यमंत्री श्रीमती मिसाळ बोलत होत्या.

राज्यमंत्री श्रीमती मिसाळ म्हणाल्या की, मॉलमध्ये मधल्या भिंती काढून फेरबदल करण्यात आले होते. यासाठीचा बदल आराखडा महापालिकेने २४ फेब्रुवारी २०२० रोजी मंजूर केला होता. तसेच बहुउद्देशीय हॉलसाठी पर्पज बदलाची परवानगी २०२३ मध्ये देण्यात आली होती. या काळात दोन कोटींच्या दंडाची वसुली आणि तीन कोटींचा प्रीमियम महापालिकेने घेतला. मे महिन्यात आलेल्या तक्रारीनंतर तपासात मॉलमध्ये शेडसह नवीन अतिक्रमण असल्याचे महापालिकेने मान्य केले असून त्यावर लवकरच कारवाई केली जाणार आहे. तसेच इमारतीच्या चौथ्या मजल्याच्या स्ट्रक्चरल सुरक्षिततेबाबतही महापालिकेला तातडीने ऑडिट करण्याचे आदेश देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

**उपमुख्यमंत्री अजित पवार**

## दारु दुकानांच्या स्थलांतरासाठी सोसायटीची एनओसी बंधनकारक




नागपूर (प्रतिनिधी) राज्यात एफ.एल–2 आणि सी.एल–3 परवानाधारक विदेशी व देशी दारू किरकोळ विक्री केंद्रांच्या स्थलांतरासाठी नोंदणीकृत सोसायटीची एनओसी अनिवार्य करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असल्याची माहिती उपमुख्यमंत्री व उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली. सदस्य शंकर जगताप यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते.पवार म्हणाले की, संबंधित दुकान सोसायटी परिसरात असेल तर सोसायटीची संमती नसल्यास स्थलांतरास कोणतीही परवानगी दिली जाणार नाही. एफएल–2 आणि सीएल–3 परवान्यांबाबत ही अट आता काटेकोरपणे लागू राहील. पिंपरी-चिंचवड येथील कोळीवाडा आणि रहाटणीतील दोन अनधिकृत दारू दुकाने निलंबित करण्यात आल्याचेही उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले. यापैकी एक प्रकरण न्यायालयात प्रलंबित असून उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कारवाई केली जाईल, तर एका दुकानावर यापूर्वी रुपये 50,000 दंड आकारण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**ॲड. राहुल नार्वेकर**

## राज्यातील ई-वाहनांना टोलमाफीची आठ दिवसात अंमलबजावणी करा



नागपूर (प्रतिनिधी) राज्यातील ईव्ही व ई-बाइक वापरकर्त्यांना टोलमाफी देण्याबाबत पुढील आठ दिवसांत कार्यवाही करावी, असे स्पष्ट निर्देश देत या निर्णयाच्या अंमलबजावणी पासून आज पर्यंतच्या काळात टोल घेतला गेला असल्यास पुरावा सादर केल्यावर नागरिकांना टोल परतावा द्यावा, असे आदेश विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी दिले. ई वाहनांना टोल माफी देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. या संदर्भात काढलेल्या शासन निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याची बाब सदस्य अनिल पाटील यांनी विधानसभेत मांडली. त्यावर अध्यक्ष ॲड. नार्वेकर यांनी हे निर्देश दिले. अध्यक्ष ॲड. नार्वेकर यांनी राज्यातील अपुऱ्या चार्जिंग स्टेशन्सचा मुद्दाही उपस्थित करत, ई-वाहनांसाठी किमान 120 के.डब्लू. (KW) क्षमतेची फास्ट चार्जिंग स्टेशन्स उभारण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. सध्या उपलब्ध चार्जिंग स्टेशन्सवर वाहन चार्जिंगसाठी आठ तास लागत असल्याने ही व्यवस्था तातडीने सुधारावी, असेही त्यांनी म्हटले.



# वाढवण बंदर ते समृद्धी महामार्ग जोड प्रकल्पाच्या कामाला लवकरच सुरुवात

नागपूर (प्रतिनिधी) वाढवण बंदर केवळ पालघर जिल्ह्यासाठीच नव्हे, तर संपूर्ण राज्य आणि देशाच्या जलद आर्थिक विकासाचा केंद्रबिंदू ठरणार आहे. या बंदराशी संलग्न पायाभूत सुविधा उभारण्याचे काम प्रगतिपथावर असून, त्यातील वाढवण बंदर ते हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग जोडमार्गाचे (फ्रेट कॉरिडॉर प्रकल्प) काम लवकरच सुरू केले जाईल, अशी माहिती मंत्री दादाजी भुसे यांनी विधानसभेत दिली.

विधानसभा सदस्य महेश सावंत, श्रीमती मनिषा चौधरी, राहुल पाटील, योगेश सागर, रईस शेख, हिरामण खोसकर यांनी फ्रेट कॉरिडॉर प्रकल्पासंदर्भात प्रश्नोत्तराच्या तासात प्रश्न उपस्थित केला त्यावर, मंत्री श्री.भुसे यांनी उत्तर दिले.

राज्याच्या महत्त्वाकांक्षी बंदर विकास उपक्रमाला गती देण्यासाठी हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. सध्या प्रस्तावित जोडमार्गाची लांबी साधारण 104–105 किलोमीटर असून, त्यासाठी 3+3 अशा सहा लेनची रचना केली जात आहे. महामार्गाची प्रस्तावित रुंदी 100 मीटर तर बोगद्यांची रुंदी 80 मीटर इतकी असेल. या मार्गावर 100 किमी प्रति तास वेगाने प्रवास करता येणार असून, प्रवासाचा कालावधी मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.



सध्याच्या 183 किलोमीटर अंतराच्या तुलनेत नवीन जोडमार्गामुळे प्रवास 104 किलोमीटरपर्यंत होणार असून यात सुमारे 78 किलोमीटरची बचत होईल. चार ते पाच तासांचा प्रवास कमी होऊन तो एक ते दीड तासात पूर्ण होईल. प्रस्तावित महामार्ग पालघर जिल्ह्यातील डहाणू, विक्रमगड, जव्हार, मोखाडा तसेच नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर या भागांतून जाणार आहे. एकूण ६५ गावे या मार्गात समाविष्ट असून या प्रकल्पाचा डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट (DPR) तयार करण्याचे काम सुरू असून १४,००० कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित असल्याचे मंत्री श्री.भुसे यांनी सांगितले. हा प्रकल्प संबंधित सर्व स्थानिक शेतकरी बांधव, भूमिपुत्र तसेच त्या भागातील नागरिकांना विश्वासात घेऊनच तयार केला जाणार असल्याचे मंत्री श्री.भुसे यांनी सांगितले.

# राज्यातील आरोग्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी बृहत आराखडा तयार करा : आरोग्यमंत्री अबिटकर

## बांधकामाधिन रुग्णालयांच्या इमारत कामांचा घेतला आढावा

**नागपूर (प्रतिनिधी) राज्यात लोकसंख्यानिहाय आरोग्य उपकेंद्र ते संदर्भ सेवा रुग्णालयापर्यंत बळकटीकरणावर भर देत दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्यासाठी राज्याच्या बृहत आराखडा तयार करण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. विधान भवन येथे समिती कक्षात आरोग्य विभागाच्या बांधकामाधीन इमारतींचा आढावा बैठकीत आरोग्यमंत्री श्री आबिटकर बोलत होते.**

आरोग्य मंत्री श्री. आबिटकर म्हणाले की, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्यात उभारण्यात आलेल्या आरोग्य संस्थांच्या इमारतींचा रुग्णसेवेत उपयोग करावा. मागणीप्रमाणे आरोग्य संस्थांचे श्रेणीवर्धन करण्यात यावे. आरोग्य संस्थांच्या इमारतींची अंदाजपत्रके तपासून घेण्यात यावीत. रुग्णालयांमध्ये स्वच्छता, रुग्णांना मिळणार आहार आणि मनुष्यबळ याबाबत कुठलीही तडजोड केली जाणार नाही. स्वच्छतेबाबत कटाक्षाने कारवाई करावी. स्वच्छतेच्या कामासाठी नियुक्त कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन द्यावे. कामात व्यत्यय आणून काम बंद पाडणाऱ्या



तसेच कामात कुचराई करीत असलेल्या कंत्राटदारांना काळे यादीत टाकावे संबंधित दोषी अधिकाऱ्यांवरही कारवाई करण्याचे निर्देश आरोग्यमंत्री आबिटकर यांनी दिले.

ठाणे सामान्य रुग्णालयाचे काम युद्ध पातळीवर पूर्ण करून रुग्णालय रुग्णसेवेत रुजू करण्याचे निर्देशही आरोग्य मंत्री यांनी दिले. बैठकीत संगमनेर (जि. नगर) येथील स्त्री रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिवती ग्रामीण रुग्णालय (जि. चंद्रपूर), डागा रुग्णालय नागपूर, उमरेड उपजिल्हा रुग्णालय , प्राथमिक आरोग्य केंद्र सिरसी ता. उमरेड, प्राथमिक आरोग्य केंद्र नांद ता भिवापूर, कुही (जि नागपूर) ग्रामीण रुग्णालय, धाराशिव जिल्हा रुग्णालय, मलकापूर (ता. शाहूवाडी जि. कोल्हापूर) येथील ग्रामीण रुग्णालय, पालघर जिल्ह्यातील मनोर ट्रॉमा केअर आणि अन्य रुग्णालयांचा कामांचा आढावा घेण्यात आला.

## मुंबई उपनगरातील मागाठाणे येथील झोपड्या तोडकाम प्रकरणाची 60 दिवसात चौकशी

नागपूर (प्रतिनिधी)मुंबई उपनगरातील मागाठाणे परिसरातील झोपड्यांच्या तोडकाम प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेने न्यायालयीन आदेशानुसारच कार्यवाही केली आहे.

याबाबत अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमून ६० दिवसांच्या आत चौकशी पूर्ण करून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

सदस्य प्रकाश सुर्वे यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेस उत्तर देताना मंत्री सामंत बोलत होते.

मंत्री सामंत म्हणाले की, संबंधित जमीन 2020 मध्ये शैलाजी इन्फ्रास्ट्रक्चरकडे हस्तांतरित झाली. तोडकामावेळी 1995 पूर्वीच्या झोपड्यांना लागू होणारा संरक्षणाचा नियम लागू होतो का,

याची तत्काळ तपासणी करण्याचे निर्देश महापालिकेला देण्यात येतील. नियम लागू झाल्यास झोपडीधारकांना दिलासा देण्याबाबत शासन सकारात्मक निर्णय घेईल. तोडकामादरम्यान बाऊन्सर लावल्याच्या आरोपांची चौकशी समितीमार्फत करण्यात येईल. तोपर्यंत कोणतीही निवासी झोपडी पाडली जाणार नाही.

यावेळी चर्चेत सदस्य भास्कर जाधव आणि मनिषा चौधरी यांनी सहभाग घेतला.

## पंकजाताईंच्या हस्ते भगवती माता मंदिराचा शिलान्यास

**नागपूर (प्रतिनिधी) मौजे खैरी (जि. नागपूर) येथे नव्यानेच उभारण्यात येत असलेल्या भगवती माता मंदिराचा शिलान्यास राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज मोठया थाटात करण्यात आला.**



शहरापासून जवळच असलेल्या खैरी ग्रामपंचायत अंतर्गत अनंतश्रीविभूषित श्रीमद जगदगुरू स्वामी श्री प्रज्ञानंद सरस्वती जी महाराज यांच्या पुढाकाराने भगवती माता मंदिर उभारण्यात येत आहे. परिसरातील दानशूर भक्तांनी यासाठी जमीन दान केली आहे. आज या मंदिराचा शिलान्यास ना. पंकजाताईंच्या हस्ते करण्यात आला. यावेळी स्वामी श्री प्रज्ञानंद सरस्वती महाराज आणि समस्त भक्तगण उपस्थित होते. भगवती माता मंदिराचा शिलान्यास माझ्या हस्ते झाला,यासाठी स्वतःला मी भाग्यवान समजते. हे मंदिर समस्त भक्तगणांना उर्जा देणारे अध्यात्मिक केंद्र बनेल असं याप्रसंगी ना. पंकजाताईंनी सांगितलं. याप्रसंगी स्वामी प्रज्ञानंद यांनी पंकजाताईंना आशीर्वाद आणि शुभेच्छा दिल्या.

## नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा 2027 बोधचिन्ह स्पर्धेत प्रवेशिका पाठविण्याचे आवाहन

नाशिक (प्रतिनिधी) श्रद्धा, पावित्र्य आणि अध्यात्माचा संगम असलेला सिंहस्थ कुंभमेळा नाशिक त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये होणार आहे. यानिमित्त नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणातर्फे बोध चिन्ह स्पर्धेचे (लोगो डिझाईन) आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभाग नोंदविण्यासाठी आता अवघे दहा दिवस राहिले आहेत. त्यामुळे या स्पर्धेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे अनुक्रमे तीन, दोन आणि एक लाख रुपयांच्या पारितोषिकांसह प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

या स्पर्धेसाठी २० डिसेंबर, २०२५ पर्यंत प्रवेशिका पाठविता येणार आहेत, असे विभागीय आयुक्त तथा नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण गेडाम यांनी कळविले आहे. नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणारा सिंहस्थ कुंभमेळा हा जगातील सर्वात मोठ्या आध्यात्मिक मेळाव्यांपैकी एक आहे. तो दर बारा वर्षांनी एकदा राज्यातील नाशिक जिल्ह्यातून वाहणाऱ्या दक्षिण गंगा अर्थात गोदावरी नदीच्या काठावर भरतो. अमृत मंथनाच्या आख्यायिकेत येणारा हा कुंभमेळा श्रद्धा, पवित्रता आणि नवनिर्माणाच्या शाश्वत चक्राचे प्रतीक आहे. बारा जोतिर्लिंगांपैकी एक असलेले त्र्यंबकेश्वर, नाशिकची समृद्ध संस्कृती, मंदिरे आणि घाटांचे आध्यात्मिक आणि ऐतिहासिक प्रतिबिंब या कुंभमेळ्यात दिसते. नाशिक-त्र्यंबकेश्वरच्या आध्यात्मिक साराचे आणि भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे प्रतीक हे बोध चिन्ह असावे. बोधचिन्हासाठी कमाल आकार ५ एमबी (पीडीएफ) असावा. स्पर्धेत दिलेल्या ले-आउटनुसार बोधचिन्हाची डिझाइन ए १ आकाराच्या पोस्टरवर असावे. बोधचिन्हाची रंगीत, कृष्णधवल प्रतिमा आणि बोधचिन्हाबाबत माहिती देणारी १५० शब्दांची टिपणी असावी. स्वाक्षरी केलेल्या आणि स्कॅन केलेल्या अटी आणि शर्तींची कमाल आकार १ एमबी (पीडीएफ) फाइल. संकल्पना टीप, पोस्टर, प्रतिमा, फाइल नावासह, अर्जदाराची ओळख स्थापित करण्यासाठी नाव, संस्थेचे नाव किंवा कोणतेही संदर्भ यासारखी कोणतीही वैयक्तिक माहिती नसावी.

राज्यात आरोग्यसेवा अधिक सक्षम


## आयुष्मान भारत–महात्मा फुले योजनेंतर्गत मोठ्या सुधारणा लागू

मुंबई (प्रतिनिधी) राज्यातील नागरिकांना अधिक दर्जेदार, सुलभ आणि पूर्णपणे कॅशलेस आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या एकत्रित अंमलबजावणीत राज्य सरकारने जानेवारी २०२५ पासून महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या आहेत. या सुधारणा आरोग्यव्यवस्थेतील कार्यक्षमता, पारदर्शकता आणि सेवा गुणवत्तेत मोठी वाढ घडवून आणतील, असा विश्वास आहे.

उपचारांची संख्या १३५६ वरून २३९९ पर्यंत योजनेत उपलब्ध उपचार पॅकेजेसची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढवण्यात आली आहे. यामुळे अधिक आजारांचे उपचार कॅशलेस पद्धतीने उपलब्ध होणार असून ग्रामीण आणि शहरी भागातील लाखो रुग्णांना याचा थेट लाभ मिळणार आहे. रुग्णालयांसाठी वाढीव दर आणि सुधारित पॅकेजेस योजनेअंतर्गत रुग्णालयांना मिळणारे उपचार दर वाढवण्यात आले आहेत. पॅकेजेसचे पुनर्मुल्यांकन करून अनेक उपचारांसाठी अधिक शुल्क मिळण्याची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे रुग्णालयांना सेवा अधिक सक्षमपणे देणे शक्य होणार आहे. गुणवत्तेला प्राधान्य – १०% ते १५% प्रोत्साहन रक्कम एनएबीएच व एनक्यूएएस गुणवत्ता मानके पूर्ण करणाऱ्या रुग्णालयांसाठी दावा रकमेच्या वर अतिरिक्त १०% ते १५% प्रोत्साहन देण्याचा निर्णय झाला आहे. यामुळे रुग्णालयांना उच्च दर्जाचे उपचार देण्यास प्रोत्साहन मिळेल. जिल्हास्तरीय समित्या कार्यान्वित योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा सनियंत्रण आणि तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात आली आहे. तसेच पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय जन आरोग्य संरक्षण कार्यकारिणी गठित करण्यात आली आहे. या समित्यांमुळे निरीक्षण, तक्रार निवारण आणि धोरणात्मक मार्गदर्शन अधिक मजबूत होणार आहे. २४ तास कार्यरत कॉल सेंटर योजनेविषयी माहिती आणि तक्रार निवारणासाठी नागरिकांसाठी २४ तास कार्यरत असलेले — १५५३८८ / १८००२३३२२०० आणि १४५५५ / १८००१११५६५. हे टोल-फ्री क्रमांक उपलब्ध आहेत.

नागपूर हिवाळी अधिवेशन 2025

## विधानसभा प्रश्नोत्तरे थेट अधिवेशनातून...



### यंदाच्या हंगामात 19 लाख टन सोयाबीन हमीभावाने खरेदीचे उद्दिष्ट : जयकुमार रावल

नागपूर (प्रतिनिधी) नाफेडच्या माध्यमातून यंदाच्या हंगामामध्ये 19 लाख टन सोयाबीन हमीभावाने खरेदीचे उद्दिष्ट असून हमीभावाने कापसाची खरेदी करण्यासाठी सीसीआयच्या केंद्रांमध्ये वाढ करण्यात येणार असल्याची माहिती पणनमंत्री जयकुमार रावल यांनी विधानसभेत दिली. नाफेड, सीसीआयची हमीभाव केंद्र सुरु करणे व शेतमालाला व कापसाला हमीभाव मिळणेबाबत आमदार संतोष दानवे यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला. त्याला उत्तर देताना मंत्री रावल बोलत होते. सध्या एफएक्यू दर्जाच्या कापसाची खरेदी 5,328 रुपये हमीभावाने सुरू आहे. मागील वर्षापेक्षा 50 अतिरिक्त केंद्रे यंदा उघडण्यात आली आहेत. राज्यातील अंदाजे 80 लाख मेट्रिक टन सोयाबीनपैकी सुमारे 25 टक्के सोयाबीन 'इंटरव्हेन्शन स्कीम'अंतर्गत खरेदी होणार असून बाजारभाव कोसळू नयेत हा या योजनेचा मुख्य उद्देश असल्याचे पणन मंत्री रावल यांनी सांगितले.या वेळी चर्चेत विजय वडेट्टीवार, कैलास पाटील, बबनराव लोणीकर आणि प्रकाश सोळंके यांनीही सहभाग घेतला.

### कृषी योजनांच्या लाभापासून कोणताही शेतकरी वंचित राहणार नाही : कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

नागपूर (प्रतिनिधी) राज्य शासन शेतकऱ्यांप्रती संवेदनशील असून कृषी विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या कृषी योजनांच्या लाभापासून कोणताही शेतकरी वंचित राहणार नाही, असे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधान परिषदेत सांगितले. सदस्य रणजितसिंह मोहिते पाटील यांनी राज्यातील शेतकऱ्यांच्या विविध योजनांचा निधी व अनुदान प्रलंबित असल्याबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या उत्तरात कृषी मंत्री भरणे यांनी ही माहिती दिली. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य सर्वश्री सतेज पाटील यांनी सहभाग घेतला.

### कृत्रिम वाळूचा वापर वाढवण्यावर शासनाचा भर : महसूल राज्यमंत्री योगेश कदम

नागपूर (प्रतिनिधी) नागपूर (प्रतिनिधी) राज्याच्या वाळू निर्गती धोरणानुसार वाळू गटातील १० टक्के वाळू घरकुलांसाठी राखीव ठेवण्यात येत आहे. तथापि कृत्रिम वाळूचा वापर वाढवण्यावर शासनाचा भर असल्याचे महसूल राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधान परिषदेत सांगितले. सदस्य कृपाल तुमाने यांनी कमी दरात वाळू उपलब्ध होत नसल्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री हेमंत पाटील, प्रवीण दरेकर, भाई जगताप, निरंजन डावखरे, डॉ. मनीषा कायंदे यांनी सहभाग घेतला.

### वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील गैरव्यवहारातील दोषींवर कारवाई होणार : भरणे

नागपूर (प्रतिनिधी) वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील आर्थिक व इतर गैरप्रकारात दोषी आढळणाऱ्यांवर योग्य ती कारवाई केली जाईल, असे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तरच्या तासावेळी सांगितले. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने विकासनिधी मान्यतेविना खर्च केल्याबाबत सदस्य विक्रम काळे यांनी विधान परिषदेत प्रश्न उपस्थित केला होता. या चर्चेत सदस्य सर्वश्री प्रविण दरेकर, किशोर दराडे, सदाभाऊ खोत यांनी सहभाग घेतला.

### मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी आणि मुख्यमंत्री ज्ञानपत्र योजना लवकरच आणणार : दादाजी भुसे

नागपूर (प्रतिनिधी) विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान-तंत्रज्ञानाची आवड निर्माण करण्यासाठी राज्य शासनाने प्रस्तावित केलेल्या मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी योजना मंत्रिमंडळाच्या मंजुरीनंतर अंमलात आणली जाईल, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधानसभेत दिली.विधानसभा सदस्य मुरजी पटेल यांनी प्रश्नोत्तराच्या तासात विचारलेल्या प्रश्नाला मंत्री भुसे यांनी उत्तर देताना सांगितले. शालेय शिक्षण मंत्री श्री.भुसे म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि नावीन्यपूर्ण प्रयोगांना प्रोत्साहन देण्यासाठी 'मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी' या योजनेचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता. यात तालुका स्तरावरील विज्ञान प्रदर्शनांमधून निवड झालेल्या 21 विद्यार्थ्यांना नागपूर, पुणे, मुंबई येथील सायन्स सेंटरमध्ये तसेच जिल्हा स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या 51 विद्यार्थ्यांना इसरो, बेंगळुरू येथे अभ्यास भेटीस पाठविण्याचा प्रस्ताव आहे. त्याचप्रमाणे, राज्यस्तरीय 51 उत्कृष्ट विद्यार्थ्यांना नासा, अमेरिका येथे पाठविण्यात येणार आहे.त्याचबरोबर, विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रस्तावित मुख्यमंत्री ज्ञानपत्र योजना देखील लवकरच सुरू होणार असल्याचे मंत्री भुसे यांनी सांगितले. या शाळांत वापरलेली पुस्तके गोळा करून त्यांचे पुनर्वापर करण्याचा उद्देश योजनेमागे आहे. या उपक्रमामुळे शासनाचा २५ टक्के खर्चही वाचणार असून विद्यार्थ्यांना कमी दरात पुस्तके उपलब्ध होतील. यावेळी सदस्य अमित साटम, श्रीमती देवयानी फरांदे, श्रीमती नमिता मुंदडा, प्रवीण स्वामी, नानाभाऊ पटोले, योगेश सागर, वरुण सरदेसाई यांनीही उपप्रश्न विचारले.

### यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत कोणतीही अनियमितता नाही : पाटील

नागपूर (प्रतिनिधी) यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत पदभरतीत तसेच आर्थिक अनियमितता झाली नसल्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी आज विधानसभेत सांगितले.सदस्य अनिल मांगुळकर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री पाटील बोलत होते. सहकार मंत्री पाटील यांनी सांगितले की, बँकेत आर्थिक अनियमितता झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. सदस्यांनी नमूद केलेली ५१६.६५ कोटींची रक्कम आर्थिक अनियमितता नसून २०१९ मधील नोंदीचा चुकीचा अर्थ लावल्यामुळे तयार झालेली गैरसमजूत आहे. पदभरतीसंदर्भात नाबार्डने घालून दिलेले चार अनिवार्य निकषांपैकी एक वगळता उर्वरित सर्व निकष बँकेने पूर्ण केल्यामुळे, मागितलेल्या २६७ पदांपैकी ५० टक्के म्हणजे १३३ पदांना परवानगी देण्यात आली. बँकेतील पदभरती प्रक्रियेवर काही तक्रारी दाखल झाल्यामुळे सध्या प्रक्रिया स्थगित असून, 'बोगस भरती' झालेली नाही. मागील चार वर्षांत बँकेचा एनपीए वाढला असला तरी व्यवस्थापन खर्चाचे प्रमाण दोन टक्क्यांपेक्षा कमी असल्याचे मंत्री पाटील यांनी सांगितले. संचालक व अधिकाऱ्यांच्या प्रवास आदी खर्चांबाबत उल्लेख झाल्यानंतर, २८ नोव्हेंबर रोजी जिल्हा विशेष लेखापरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून, अहवाल आल्यानंतर आवश्यक ती कारवाई केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

